नि.दि.दा.क्र. १२/२०१९ मधील नि.क्र. ८७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे.

२. वादीच्या कथनानुसार वादी यांने यातील प्रतिवादीविरुध्द दावा मिळकतींच्या वाटपासाठी व दि. १०/०९/२०१५ व दि. ११/०९/२०१५ रोजी नोंदविलेले अ.क्र. १२४४/२०१५ व १२४५/२०१५ चे हक्कसोडपत्र रद्द होवून मिळणेबाबत हक्कज्ञापन व कायम मनाईबाबत दावा दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये सदर मिळकती या हिंदू एकत्र कुटूंबाच्या असलेबाबत तसेच वादी व प्रतिवादी जवळचे नातेवाईक व भाऊबंद असलेबाबत त्यावेळचे वकीलांचेकडून घाईगडबडीत उल्लेख केला गेला होता. दाव्यात नमूद केल्याप्रमाणे हक्सोडपत्राआधारे प्रतिवादी क्र. २ हे दावा मिळकतींची विल्लेवाट लावतील या साधार भितीमुळे वादी यांनी देखील घाईगडबडीत नजरचुकीने तो मजकूर न पाहिल्याने तो तसाच आजतागायत दाव्यात राहिला आहे. सदरची चुक ही प्रतिवादींनी नि. ८३ येथे दिलेल्या अर्जास म्हणणे देणेसाठी तयारी करत असताना तसेच नि. ७९ मधील मजकूर पाहता लक्षात आला आहे. वादी व प्रतिवादी हे जवळचे नातेवईक व भाऊबंद नसल्यामुळे तसेच दाव्याचे कामी कैफियतीव्दारे व अर्जाव्दारे प्रतिवादींनी केलेली संध्दिग्ता दुर करण्यासाठी सदरची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. दाव्यातील परिच्छेद क्र. १,३,४ मध्ये दुरुस्ती करुन परिच्छे क्र.५ अर्जात नमूद केलेला मजकूर नमूद करु तशी दुरुस्ती करणेची विनंती केली आहे.

३. वादीने पुढे असे कथन केले आहे की, सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नसून वादीने केलेली मागणी ही दाव्यातील कथनांबाबत केवळ जादाचे व महत्वाचे स्पष्टीकरण देणारी व

संदिग्धता दुर करणारी अनुषंगीक व आवश्यक दुरुस्ती आहे. सदरची दुरुस्ती मंजूर झालेस प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नसुन तसे न झालेस वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे व दाव्यामध्ये संदिग्धता राहिल्यामुळे दाव्याची संख्या वाढू नये म्हणून सदरची दुरुस्ती मंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

४. प्रतिवादी क्र. २ यांनी नि. ८९ येथे म्हणणे दाखल करुन वादीचा अर्ज मान्य केला आहे.

५. प्रतिवादी क्र. १, ३ ते ५ यांनी नि. ९० येथे म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्ज खोटा, खोडसाळ असून न्यायालयाची दिशाभूल करणारा आहे. अर्जात नमूद केलेले कारण काल्पनिक आहे. पुर्वी देखील वादीने दाव्यात दुरुस्ती मागितलेली होती. पुन्हा आता दुरुस्ती मागत आहे. त्याबाबतचे कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. वादीने सर्व खापर पुर्वीच्या वकीलांच्यावर फोडलेले आहे. वादी व प्रतिवादी क्र. २ यांचे संगनमत असल्याचे प्रतिवादी क्र. २ ने दिलेल्या म्हणण्यावरुन दिसून येते. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपच बदलणारे आहे. दावा मिळकत ही एकत्र कुटूंबाची नाही असे म्हणायचे असले तर त्याने दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांचेकडे कोणत्या हक्काने एकत्रात आल्या याबद्दलचे विश्लेषण अर्जात केलेले नाही. वादी दाव्यातील मजकूर वगळून दाव्यात दुरुस्ती मागत असल्यामुळे त्यास भारतीय पुरावा कायदा कलम ११५ ची बाधा येते. वादी प्रस्तुतच्या दुरुस्तीव्दारे नवीन केस न्यायालयात दाखल करु इच्छित असून त्याबाबतचे कोणतेही पुरावे अर्जासोबत दिलेले नाहीत. सदरच्या दुरुस्तीमुळे संदिग्धता दुर होणारी नसून ती अधिक वाढणारी असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

६. प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

मुद्दे	निष्कर्ष
१. वादी मागणी केल्यानुसार दुरूस्ती करू शकतो काय ?	नाही.
२. आदेश काय ?	अंतिम आदेशाप्रमाणे.

का र ण मी मां सा

७. वादीने निशाण क्र. ९२ येथे दाखल केलेल्या लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दोन्ही बाजूंचे म्हणणे, कागदपत्रे व एकंदरीत वस्तुस्थिती विचारात घेता सदरचा दावा हा वाटपासाठी, ठरावासाठी व कायम मनाई हुकूमाकरीता दाखल करण्यात आलेला आहे असे दिसून येते.

८. वादीचे दाव्यातील कथने पाहता, वादीचा मुळ दावा हा वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे नातेवाईक व भाऊबंद असल्याचे कथन स्पष्टणे मांडले असल्याचे दिसून येते. तसेच दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यंची वडीलोपार्जित मिळकत असल्याचे कथन करण्यात आलेले आहे. वादी हे प्रतिवादींचे नातेवाईक व भाऊबंद असल्याने, दावा मिळकती या वडीलोपार्जित असल्याने दावा मिळकती वादी, प्रतिवादी यांच्या हिंदू एकत्र कुटूंबाच्या सामाईक व मालकी हक्काच्या तसेच सहमालकीच्या जमिनींचे विभाजन न झालेल्या जमिनी आहेत हे वादीचे दाव्यातील मुख्य कथन आहे व त्यावरच वादीचा संपुर्ण दावा हा आधारीत आहे असे दिसून येते.

९. सर्वात महत्वाचे म्हणजे वादी, प्रतिवादी हे एकमेकांचे जवळचे नातेवाईक असल्या कारणानेच महसुल दप्तरी अधिकार अभिलेख नोंदीत वादी

व प्रतिवादी यांच्या सामाईक मालकी हक्काचा नोंदी फेरफार खातेउतारा व ७/१२ उता—यातील नोंदी आहे असे ही वादीने दाव्यात कथन केले आहे.

१०. प्रतिवादी क्र. २ यांनी जोरजबरदस्तीने वादी यांचेकडून दस्त अ.क्र. १२४५/२०१५ चे हक्कसोडपत्र करुन घेतले होते. त्यामुळे ते हक्कसोडपत्र रदृद होवून मिळणेकामी वादीने ठरावाची (Declaration) ची मागणी दाव्यात केलेली आहे. वादी यांनी संपुर्ण दाव्यात वेळोवेळी दावा मिळकती या सहमालकीच्या एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत व अदयापही त्याचे सरस निरस मानाने वाटप झाले नाही असे कथन करुन प्रतिवादींनी संगनमताने प्रतिवादी क्र. २ च्या हक्कात वादीकडून हक्कसोडपत्र जोरजबरदस्तीने करुन घेतले होते असे संपुर्ण दाव्यात कथन केलेले आहे.

११. प्रतिवादी क्र. १, ३ ते ५ यांनी नि. ४७ येथे दि. २५/०३/२०१९ रोजी कैफियत देवून वादीची दाव्यातील कथन नाकारली आहेत. मात्र त्यांनी जरी दावा मिळकती या सामाईक मालकीच्या असल्याचे व अदयापही वाटप झाले नसल्याचे कथन केले मात्र त्यांनी वादी व प्रतिवादी क्र. २ यांनी संगनमताने दावा मिळकती या स्वत:च्या एकटयांच्या फायदयाकरीता बळकावयाच्या असल्याने वादी व प्रतिवादी क्र. २ यांनी हा दावा दाखल केल्याचे कथन केले आहे.

१२. त्यानंतर वादी यांनी दि. २६/०६/२०१९ रोजी निशाण क्र. ५० येथे दिवाणी प्रक्रिया संहिता ६ नियम ७ प्रमाणे दावा दुरुस्तीचा अर्ज करुन दाव्यात कलम ४ उपपरिच्देद १ मध्ये दुरुस्ती करुन त्यामध्ये

'' यातील प्रतिवादी क्र. २ हे वादी यांचे वर्ग १ मधील नातेवाईक नसल्याने व त्या कारणाने प्रतिवादी क्र. २ यांना दावा मिळकतीमधील हक्क सोडणेचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. तसेच याच कारणाने हक्कसोडपत्र चुकीचे व बेकायदेशीर होत असून कथित अ.नं. १२४४/२०१५ चे हक्कसोडपत्राने वादी यांचा प्रतिवादी क्र. २ यांचे अर्ध्या हिश्श्यात मालकी हक्क निर्माण होवू शकत नाही व त्या कारणानेही केवळ दस्त झाला असल्याने व त्याप्रमाणे

कब्जा दिलेला नसल्याने तो बेकायदेशीर, शुन्य व रद्दबातल असल्याने हक्कज्ञापन मागणे भाग पडले आहे. तसेच याच दस्तासोबत कथित अ.नं. १२४५/२०१९ चे हक्कसोडपत्राचा दस्त झालेला आहे व सदर हक्कसोडपत्राने देखील प्रतिवादी यांचा वादी यांचे अर्ध्या हिश्श्यात मालकी हक्क निर्माण होवू शकत नाही व केवळ दस्त झाला असल्याने व त्याप्रमाणे कब्जा दिलेला नसल्याने तो बेकायदेशीर, शुन्य व रद्दबातल आहे. त्यामुळे वादी यांनी याच दस्तासोबत झालेला हक्कसोडपत्राचा दस्त क्र. १२४५/२०१५ हा रद्द करुन मागितलेला असल्याने व तोही या दस्ताप्रमाणे म्हणजेच अ.नं. १२४४/२०१५ याप्रमाणे बेकायदेशीर व शुन्य रद्दबातल व बेकायदेशीर आहेत व तसे हक्कज्ञापन होवून मिळणेसाठी प्रस्तुत दावा दाखल करणे भाग पडले आहे. ''

हा मजकूर घालून मागितला आहे. तसेच वादीने त्या अनुषंगाने दाव्यात इतरही दुरुस्त्या केलेल्या आहेत. सदरची दुरुस्ती पाहता, प्रतिवादी क्र. २ हे वादीचे वर्ग १ मधील नातेवाईक नसल्याने व त्यामुळे त्यांना दावा मिळकतीतील हक्क सोडणेचा प्रश्न नव्हता या स्वरुपाचा नवा मजकूर घालण्यात आला असे दिसून येते.

१३. सदरची दुरुस्ती पाहता ही दुरुस्ती वादीने मुळ दावा दाखल केलनंतर जवळ जवळ ८ महिन्यांनी केली आहे. त्यामध्ये देखील वादीने, प्रतिवादी क्र. २ हा त्याचा वर्ग १ मधील नातेवाईक नसल्याचे कथन केले आहे. म्हणजेच या दुरुस्तीवेळी वादीला प्रतिवादी क्र. २ हा त्याचा जरी वर्ग १ मधील नातेवाईक नसला तरी तो इतर वर्गातील नातेवाईक आहे असेच म्हणावयाचे होते हे स्पष्ट होते.

१४. त्यानंतर वादीने प्रतिवादी विरुध्द प्रश्नावली दाखल केली व त्यामध्ये प्रतिवादींनी त्यांच्या निशाण क्र. ६१ मध्ये नमूद प्रश्नांची उत्तरे मागितली होती.

१५. सदरची प्रश्नावलीतील प्रश्न पाहता देखील वादीने या प्रश्नातून वादी व प्रतिवादी हे एकाच कुटूंबातील व नातेवाईक असल्याचेच कथनाच्या

पुष्ठयर्थच सर्व प्रश्न प्रतिवादींना विचारले होते हे दिसून येते. त्यानंतर वादीने सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज दिला आहे. या अर्जामध्ये मात्र वादीने जी दुरुस्ती मागितली आहे ती पाहता, दावा मिळकती या सामाईक मालकी हक्काच्या आहेत व त्या एकत्र कुटूंबाच्या नाहीत असे दर्शवणारी व वादी, प्रतिवादी हे एकमेकांचे नातेवाईक अथवा भाऊबंद नाहीत असे कथन करण्याच्या स्वरुपाच्या दुरुस्त्या मागितल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे दस्त क्र. १२४५/२०१५ हा प्रतिवादी क्र. २ ने जोरजबरदस्तीने करुन घेतला होता ही बाब देखील त्याने वगळण्याची दुरुस्ती मागितली आहे. वादीने सदरची दुरुस्ती ही दि. ०४/०३/२०२३ रोजी मागितली आहे.

१६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ पाहता

<u>Amendment of pleadings</u> – The Court may at any stage of the proceedings allow either party to alter or amend his pleadings in such manner and on such terms as may be just, and all such amendments shall be made as may be necessary for the purpose of determining the real questions in controversy between the parties :

Provided that no application for amendment shall be allowed after the trial has commenced, unless the Court comes to the conclusion that in spite of due diligence, the party could not have raised the matter before the commencement of trial.

परंतू न्यायचौकशी सुरु झाल्यानंतर, पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेवून सुध्दा न्यायचौकशी सुरु होण्यापुर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज सुधारणेचासाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

१७. वादीने मागितलेली दुरुस्ती पाहता, ही दुरुस्ती जरी दाव्याचे मुळ स्वरुपात बदल करणारी नसली तरी दाव्यातील पुर्ण कथनेच बदलून टाकणारी

आहेत. सदरची दुरुस्ती ही वादीच्या पुर्वीपासून ज्ञानातील होती व फक्त पुर्वीच्या वकीलांनी चुकीची माहिती लिहिली होती व त्यामुळे आता वादीला अचानक दाव्यात झालेली चुक समजून आल्याने वादीने हा अर्ज दिला आहे असे वादीचे कथन न पटण्यासारखे आहे.

१८. वादीने आपल्या कथनांच्या पुष्ठयर्थ खालील न्यायनिवाडे सादर केले.

१. मध्यप्रदेश सरकार वि. युनियन ऑफ इंडिया व इतर, २०१२ AIR (SCW) ७७१

२. प्रफुल्ल मनोहर रेले वि. श्रीमती कृष्णाबाई नारायण घोसाळकर व इतर, २०१४ (१) AD (SC) ७६५

३. धनापाल चेट्टीयार व इतर वि. गोविंदराज चेट्टी व इतर, १९६१ AIR मद्रास २६२.

४. रामचंद्र सखाराम महाजन वि. दामोदर त्रिंबक टंकसाळे मयत व इतर, २००७ AIR (SCW) ४५८३.

५. श्री.जीवन कुमार मेहान वि. सौ. प्रविण वर्मा व इतर, २०२१ AD (Delhi) १३०.

६. मे. चक्रेश्वरी कंन्स्ट्शन प्रा. लि. वि. मनोहर लाल, २०१७ 172 AIC ३१

७. प्रिठी पाल सिंह व इतर वि. अमरिक सिंग व इतर २०१३ ADGLS (SC) १२७

८. भिमराव लक्ष्मण कांबळे वि. नानासो धोंडीराम मनोळे, (२०१८) २ AIR (Bom R) १९१

९. शिवराज गुप्ता व इतर वि. राजेंद्र गुप्ता व इतर, दिल्ली उच्च न्यायालय

१०. डेरा बाबा भूम्मान शहा सणगर सरिष्ठा वि. डॉ. सुभाष नरुला, पंजाब हरियाणा उच्च न्यायालय,

१९. वरील सर्व न्यायनिवाडे वाचले असता, यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांनी दावा दुरुस्ती केव्हा करता येईल याबाबत कथन केले आहे. यानुसार जोपर्यंत ही दुरुस्ती अन्यायकारण unjust तसेच समोरील पक्षाला नुकसानकारक नाही हे दाखवत नाही तोपर्यत दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी. मागण्यात आलेली दुरुस्ती ही प्रामाणिक, सद्भावमुलक (Bonafide) सद्भावपुर्ण, वास्तविक असावी, असद्भावपुर्वक (Malafide) नसावी असे सांगितले आहे. तसेच चुका या लबाडीच्या (fraudulent) नसल्या तर, सदरच्या चुका दुरुस्त करण्याची परवानगी देता येईल असेही कथन मा. न्यायालयाने केले आहे. त्यामुळे मागितलेली दुरुस्ती ही सद्भावनेने (Bonafide) आहे का ? तसेच ती लबाडीने (fraudulent) नाही हे पाहणे गरजेचे ठरते.

२०. प्रतिवादीतर्फे खालील न्यायनिर्णय दाखल करण्यात आले.

१. शकुंतला गुजर वि. दिलीप पवार व इतर २००१(२) All MR ५६६

२. श्री.भाउराव लक्ष्मण होंडे वि. नामदेव लक्ष्मण होंडे, २००१(२) All MR ७९९

३. मे. वैष्णवी साई श्री महालक्ष्मी जगदंबा शिक्षण संस्था, नागपूर वि. पुर्वा विदर्भ महिला परिषद, २०२२ (१) All MR ३४३

४. हिरालाल वि. कल्याण माल व इतर १९९८ AIR SCW २१९

२१. प्रतिवादींनी दाखल केलेले न्यायनिवाडे वाचले असता, मागितलेली दुरुस्ती ही वैकल्पीक अथवा विसंगत (inconsistent) असू शकते मात्र या दुरुस्तीमुळे जर पुर्णपणे विरोधाभासी आणि नवीनच केस समोर येत असेल आणि आपल्या मुळच्या केसच्या पुर्णपणे विरोधातील कथने समोर येत असतील तर अशी दुरुस्ती ही नुकसानकारक ठरणारी आहे व त्यामुळे ही प्रमाणिक, सद्भावमुलक (Bonafide) ठरत नाही. त्यामुळे अशी दुरुस्ती करण्याची परवानगी

देणे म्हणजेच पूर्ण दाव्याचे स्वरुपच बदलणारी ठरते असे कथन *मे. वैष्णवी साई श्री महालक्ष्मी जगदंबा शिक्षण संस्था, नागपूर वि. पुर्वा विदर्भ महिला परिषद, २०२२ (१) All MR ३४३* या न्यायनिवाडयामध्ये केले आहे. यावरुन मा. सर्वोच्च न्यायालयाचे तत्वानुसार दुरुस्ती जर प्रमाणिक, सद्भावमुलक (Bonafide) असेल तर ती करण्याची परवानगी द्यावी. या तत्वानुसार वरील मा. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडयातील कथनाप्रमाणे पुर्णत: नवीनच केस निर्माणहोत असेल तर ती दुरुस्ती प्रमाणिक, सद्भावमुलक (Bonafide) ठरत नाही.

२२. यावरुन सदरच्या मुळ दाव्यातील कथने पहाता त्यानंतर निशाणी क्र. ५० येथील वादीने मागितलेली दुरुस्ती पाहता, वादीने वारंवार वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे नातेवाईक, भाऊबंद असल्याचे कथन केले आहे व दावा मिळकती या हिंदू कुटूंबाच्या एकत्रित मिळकती असल्याबाबत ठामपणे कथन केले आहे. मात्र अचानकपणे वादींनी या दुरुस्तीव्दारे वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे नातेवाईक व भाऊबंद नसल्याचे कथन करुन पुर्ण मुळ दाव्यातील कथनेच नाकारली आहेत. वादीला पुर्वी ही बाब माहिती नव्हती व दावा दाखल करतेवेळी पुर्ण प्रयत्न करुनही वादीला ही बाब माहिती होवू शकली नाही. त्यामुळे अचानक वादीला सदरची बाब समजल्यामुळे अचानक दावा दाखल केल्यानंतर ४ वर्षानी वादींनी ही दुरुस्ती मागितली असे कदापि म्हणता येणार नाही. कारण वादी व प्रतिवादी हे नातेवाईक व भाऊबंद नाहीत ही बाब वादीस पुर्वापासूनच माहित असणार हे स्पष्ट आहे. मात्र दावा दाखल करत असताना व निशाणी ५० येथील दुरुस्ती मागत असतानाही वादीने त्याला पुर्ण संधी असूनही त्याने ही बाब न्यायालयापासून लपवून ठेवली होती. यावरुन वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आला नाही.

२३. त्यानंतर वादीने अचानकपणे ही दुरुस्तीमागून वादी हा प्रतिवादींचा

नातेवाईक व भाऊबंद नसल्याचे कथन केले आहे. यावरुन ही दुरुस्ती प्रमाणिक, सद्भावमुलक (Bonafide) ठरत नाही उलट ती लबाडीची (fraudulent) ठरते व सदरची दुरुस्ती दाव्याचे पुर्ण स्वरुपच बदलून टाकणारी आहे. सबब, वादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येत आहे.

Digitally signed by Nanda Bapuso Ghatage
Date: 2023.11.07 19:28:02 +0530

(श्रीमती एन.बी.घाटगे)

दिनांक : ०१/११/२०२३. दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.